# नियमीत दिवाणी दावा क्र.२४७/२०१२
# अर्ज निशाणी–९३ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ६ नियम १७ अन्वये दाखल केला आहे.

२. अर्ज व त्यावरील जबाब वाचला. दोन्ही बाजूंच्या विधीज्ञांचा युक्तीवाद श्रवण केला.

३. प्रस्तुत अर्जान्वये प्रस्तुत दाव्यात वादी यांचे म्हणणे थोडक्यात असे की, सदरकामी सदर दाव्यात प्रतिवादी क्र.८ सौ. कांताबाई शरद ढमढेरे म्हणुन नमुद केलेले आहे, परंतु दाव्याचे समन्स बजावणीकरीता बेलिफ गेले असता तिने नाव नामंजुर असल्या कारणाने दाव्याचे समन्स व नोटीस घेण्यास नकार दिला असा अहवाल मे. न्यायालयात दाखल झाला व त्यानंतर वादी यांनी गावी चौकशी केली असता त्यामध्ये वकीलांकडून नजरचुकीने सौ. कांताबाई **अरविंद** ढमढेरे ऐवजी सौ. कांताबाई **शरद** ढमढेरे असा चुकीचा मजकुर नजरचुकीने दाव्यात नमुद केल्याची बाब वादी यांचे नुकतीच समजली त्यामुळे दाव्याचे टायटलमध्ये प्रतिवादी क्र.८ सौ. कांताबाई **अरविंद** ढमढेरे ऐवजी सौ. कांताबाई **शरद** ढमढेरे अशी दुरुस्ती करण्याचे मंजूर करुन सदरील दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी.

४. प्रतिवादी यांनी सदरील अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला असुन त्यांनी असे नमुद केले की, सदरचा दावा वादी यांनी सन २०१२ साली दाखल केला असुन जाणूनबुजून चुकीचे नाव दाव्यामध्ये नमुद करुन दावा दाखल केलेला आहे. वादी १० वर्षानंतर प्रतिवादी क्र.८ यांचे नाव दुरुस्त करुन मागत आहे तसेच वादी यांचा सदरचा अर्ज कायद्याने मेंटेनेबल नसुन तो फेटाळण्यात यावा.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता तसेच कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरील दावा ठराव, वाटप, स्वतंत्र कब्जा व निरंतरचे ताकीदीसाठी आहे. सदरील दावा पुर्ण गुणदोषावर निर्णयीत होण्यासाठी सदरील दाव्यामध्ये **प्रतिवादी क्र.८** यांचे नाव दुरूस्त करणे गरजेचे असल्याने सदरील अर्जामध्ये मागणी केलेली दुरुस्ती करणे आवश्यक व क्रमप्राप्त झालेले आहे. तसेच दुरूस्ती मंजूर केल्यास अभय पक्षातील वादाचे कायमस्वरुपी निराकरण करणे सोयीचे होईल. तसेच दाव्यामध्ये अर्जामध्ये वादींनी

मागणी केलेली दुरुस्ती केल्यास दाव्याच्या मूळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. परंतु अर्ज करण्यास झालेल्या विलंबामुळे प्रतिवादी यांचे झालेले नुकसान देखील नजरअंदाज करुन चालणार नाही. त्यामुळे सदरील अर्ज हे योग्य दंड लावून मंजूर करणे न्यायाचे ठरले. कारणे आदेश :-

**आदेश**

१. अर्ज रक्कम **रु.४००/-** च्या दंडासह मंजूर करणेत येत आहे.

२. वादींनी दाव्यात विहीत मुदतीत अर्जात नमुद दुरुस्ती करुन तात्काळ दुरुस्ती दाव्याची प्रत दाखल करावी.

सासवड.
दिनांक : ०५/०१/२०२३.

सही/-XXX
**(श्री. एम. एस. भरड)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सासवड.